# नाशिक महानगरपालिका,नाशिक.
## जाहिर आवाहन

मा.शासनाचे शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.४६/नवि-२०,मंत्रालय, दि. २९ ऑक्टोंबर २०१६ अन्वये ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांचे सुध्दा आधार कार्ड नोंदणी करणे आवश्यक केले आहे. विविध शिष्यवृत्ती योजना तसेच अनुदान योजनेचा लाभ घेण्याकरिता आधार कार्ड नोंदणी क्रमांक आवश्यक केला आहे. ज्या नागरिकांनी अद्यापपावेतो आधार कार्ड नोंदणी केलेली नाही. अशा नागरिकांचे व ० ते ६ वयोगटातील बालकांची १०० टक्के आधार नोंदणी करणेकरीता मा.शासनाचे मुख्य सचिव यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक सीएसओ-२०१६/इ-१८८७३०४/डि-१, दि. १७ ऑक्टोंबर २०१६ चे पत्रान्वये सुचित केले आहे. त्या अनुषंगाने नाशिक महानगरपालिकेने विशेष मोहिम सुरु केलेली आहे. त्या करीता नाशिक महानगरपालिकेच्या सर्व सहाही विभागीय कार्यालयामध्ये आधारकार्ड नोंदणी किटस् बसविणेत आले असुन त्या ठिकाणी आधारकार्ड नोंदणी करण्यात येत आहे.

तरी सर्व संबंधीत नागरिकांना आवाहन करण्यात येते की, ज्यांनी अद्याप पावेतो आपले आधारकार्ड नोंदणी केलेली नाही किंवा ज्यांचे पाल्यांची आधारकार्ड नोंदणी झालेली नाही त्यांनी नाशिक महानगरपालिकेच्या जवळच्या विभागीय कार्यालयामध्ये आवश्यक त्या कागदपत्रांसह (जसे रहिवाशी पत्याचा पुरावा, ओळखपत्र, जन्म तारखेचा पुरावा इत्यादी ) आधारकार्ड नोंदणी करुन घेण्याचे करावे.

Sd/-
**उप आयुक्त (स्था.सं.कर)**
**नाशिक महानगरपालिका,नाशिक.**

Sd/-
**अति. आयुक्त-१**
**नाशिक महानगरपालिका,नाशिक.**